# श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव जि. बुलडाणा

(पब्लिक ट्रस्ट रजि. नं. ए-२५० बुल.)

## नम्र निवेदन

श्री संस्थेच्या असे निदर्शनास आले आहे की गेल्या काही दिवसांपासून, काही मंडळी झटपट प्रसिध्दी, खोटी प्रतिष्ठा आणि त्यातून मिळणाऱ्या आर्थिक लाभापोटी श्री संस्थेची कोणतीही पुर्व–परवानगी अथवा लेखी अनुमती न घेता 'श्री संस्था आणि श्रींचे सेवाधारी विश्वस्त' यांचेविषयी तसेच श्री संस्थेच्या सेवा–परंपरेविषयी लिखाण करुन त्याचे परस्पर मुद्रण व प्रकाशन करीत आहेत. तसेच 'आपण श्री संस्थेशी संबंधीत असल्याचे भासवून' केलेल्या या लिखाणामुळे श्री भक्तांची दिशाभूल होत असल्याचेही श्री संस्थेच्या निदर्शनास आलेले आहे.

प्रसिध्दीसाठी हपापलेल्या या बेजबाबदार मंडळींचे अशा प्रकारचे अयोग्य वर्तन, 'श्री संस्थेचे ध्येय, उद्देश, शिस्त, नियम आणि सेवा–परंपरेची पायमल्ली करणारे'असून 'श्री भक्तांच्या श्रध्दा–भावनेला हानी पोहचविणारे' आहे. अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घालण्यात आला नाही तर विधीनिषेध शुन्यवृत्तीचा विषवृक्ष फोफावण्याची दाट शक्यता आहे.

श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव (पब्लिक ट्रस्ट रजि.नं.ए–२५० बुल.) हा नोंदणीकृत धार्मिक व धर्मादाय सार्वजनिक विश्वस्त न्यास असून 'सर्वे भवन्तु सुखिनः' या संस्थेच्या ब्रिदवाक्यास अनुसरून शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक व लोकोपयोगी सेवाप्रकल्प राबवून भक्तांची व जनसामान्यांची अविरत सेवा करीत आहे. श्रींचे सेवाधारी विश्वस्त, सेवक व सेवाधारी श्रींची व श्री भक्तांची सेवा हेच परम ध्येय व उद्दिष्ट हे शिरोधार्य मानून मनःशांती व श्रींचा कृपा आशिर्वाद लाभावा यासाठी आपली सेवा श्री चरणी रूजू करीत आहेत. येथे पैसा, प्रसिद्धी, भौतिक लोभ व व्यक्ती पुजेस कोठेही स्थान नाही.

श्री संस्थेच्या व्यवस्थेकरीता श्रींचे समक्ष जे नियम तयार करण्यात आले होते. त्यानुसारच संस्थानची आचारसंहिता, नियमावली, विचारधारा व शिस्त ठरलेली असून त्यानुसारच श्री संस्थेचे कार्य आजपावेतो सुरु आहे. सद्यस्थितीत व श्री संस्थेमध्ये भाविकाळात येणारे सेवाधारी विश्वस्त, सेवक व सेवाधारी यांनी सुद्धा या विचारधारेचे व शिस्तीचे तंतोतंत पालन करून ही सेवेची परंपरा कायम जोपासतील हीच आमची श्री चरणी दृढ निष्ठा आहे. ही सेवाकार्याची गौरवशाली परंपरा लक्षात घेता या नम्र निवेदनाद्वारे, श्री संस्था सर्व भक्तांना व जनतेला जाहिर आवाहन करते की, श्री संस्थेच्या पुर्व परवानगी शिवाय तसेच लेखी अनुमती शिवाय 'श्री संस्था, श्रींचे सेवाधारी विश्वस्त तसेच सेवा–संबंधाने छापील स्वरूपातील लेखन, मुद्रण, प्रकाशन तसेच आधुनिक प्रसार माध्यमांच्या साहाय्याने कोणताही मजकूर, लेखी अगर तोंडी सादरीकरण, डीजीटल पध्दतीतील चित्रीत बाबींचे प्रकाशन वा प्रचार करुन त्यास प्रसिध्द करु नये.' जेणेकरुन श्री भक्तांची दिशाभूल होऊन श्रध्दा व प्रतिष्ठेची हानी होईल. असे कृत्य करण्याचा प्रयत्न कुणीही करु नये मात्र, तसे घडल्यास त्यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याचे अधिकार श्री संस्था राखून ठेवीत आहे याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

वरील पैकी कोणत्याही प्रकारचे, अश्रध्द भावनेने केलेले कृत्य तात्काळ श्री संस्थेच्या निदर्शनास आणून देण्याचे सहकार्य करावे अशी श्रींच्या निस्सीम, जागरुक भक्तांना नम्र विनंती आहे.

निवेदनकर्ते

श्रींचे सेवाधारी विश्वस्त व समस्त सेवाधारी